# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे मे– २०१८

## शाहू नगर पोलीस ठाणे, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | शाहू नगर पोलीस ठाणे गुरक्र.९४/२०१२,कलम ३०२,३८७,२०१,१२०(ब) ११४,३६३,३६४(अ),३४ भादवि |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २७/०५/२०१२ रोजी १६.०० वा. पासून |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | पराणी अर्पाटमेंटजवळ, गाळा क्र. ३१६, पालवाडी, धारावी, मुंबई १७. |
| ४ | **फिर्यादी** | राजेश विश्वनाथ भांडगे वय ३७ वर्षे |
| ५ | **~~बळीत~~/मयत** | फिर्यादी यांचा १२ वर्षीय अल्पवयीन मुलगा |
| ६ | **आरोपी अटक** | १) इम्तीयाज अहमद मोहम्मद सादीक अली शेख वय २२ वर्षे,<br>२) आझाद मोहम्मुदुल्ला अन्सारी वय २२ वर्षे,<br>३) साकिर अली रहमत अली हाशमी वय २० वर्षे,<br>४) इसरार लल्लु शेख वय २१ वर्षे,<br>५) अर्सिल अहमद उर्फ पप्पु मन्सुर सय्यद वय ३९ वर्षे,<br>**अटक दिनांक ०५/०६/२०१२ रोजी १२:२० वा.** |

शाहू नगर पोलीस ठाणे गुरक्र.९४/२०१२,कलम ३०२,३८७,२०१,१२०(ब) ११४,३६३,३६४(अ),३४ भादवि या गुन्हयात दिनांक २७/०५/२०१२ रोजी १६.०० वा. पासून पराणी अर्पाटमेंटजवळ, गाळा क्र. ३१६, पालवाडी, धारावी, मुंबई १७. याठिकाणी यातील फिर्यादी यांचा १२ वर्षीय अल्पवयीन मुलगा त्यांचे राहते घरातुन कारखान्यामध्ये गेला होता तो परत घरी आला नाही. त्याचा आजुबाजुस शोध घेतला असता तो कोठेही मिळून आला नाही. त्यांनतर फिर्यादी दिंनाक २८/०५/२०१२ रोजी परत अजमेरहुन मुंबई येथे आल्यानंतर त्यांनी त्यांच्या मुलाचा आजुबाजुच्या परिसरात तसेच त्यांच्या नातेवाईकाच्याकडे व मित्रांकडे शोध घेता, तो मिळुन न आल्याने तसेच मुलगा हरविल्याबाबत पोलीसाकडे त्यांचा पुतण्या नामे रविंद्र हनुमत भांडगे वय २५ वर्षे यांनी लहान मुले हरविलेले रजिस्टर क्र. ११/१२, दि. २७/०५/२०१२ अन्वये तक्रार नोंद केल्याचे त्यांना समजलें.

त्यानंतर दिंनाक ३१/०५/२०१२ रोजी फिर्यादी याना त्याचा मोबाईलवर अनोळखी मोबाईल क्र. ७६६६१६५३०२ या नंबरवरून फोन आला व त्याच्याकडे मुलाच्या सुटकेसाठी रू.२५,००,०००/–ची खंडणीची मागणी करण्यात आली. सदरची बाब फिर्यादी यांनी दिंनाक ०१/०६/२०१२ रोजी पोलीस ठाण्यास कळविली असता फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंदवून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शाहू नगर पोलीस ठाणेच्या पथकाने मानवी कौशल्य वापरून आरोपी क्र. ०१ ते ०५ यांना दिनांक ०५/०६/२०१२ रोजी १२:२० वा. नमुद गुन्हयात अटक केली. सदर पथकाने नमुद गुन्हयाचा सखोल तपास करून अटक दोन्ही आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा प्राप्त करून दि.२८/०८/२०१२ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, १२ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई येथे कोर्ट केस क्र.२०३८/पीडब्ल्यू/ २०१२ अन्वये दोषाराप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दिनांक २८/०८/२०१२ रोजी सेशन केस क्र.६४८/१२ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

सदर पथकाने मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल विहित वेळेत सादर केला तसेच पी.एम. नोटस, मोबाईल सी.डी.आर, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडुन मोबाईल तसेच मेमरी कार्डचे पडताळणी अहवाल आणि फिर्यादी जबाब, तसेच ०४ साक्षीदार/ ०८ पुरक साक्षीदार–पंच सादर करून तसेच खटल्याच्या संपुर्ण कामकाजामध्ये साक्षीदारांना समन्स विहित वेळेत बजावणी करुन त्यांना वेळेमध्ये हजर ठेवले. तसेच मा. न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये

मयत मुलाचे पोस्टमार्टेम अहवालाबाबत नमुद केले की, '' यातील आरोपीतांनी अपहृत बालकास अत्यंत निर्घुण पणे जीवे ठार मारण्याच्या उददेशाने त्याचे शरीरावर खोलवर अनेक वार केले. तसेच मृतदेहावर अनेक फॅक्चर असल्याचेही दिसुन आले. नमुद बालकाच्या मृत्युनंतर त्याचा मृतदेह एका गोणीत घालून तो नाल्यामध्ये टाकुन दिला. यावरून आरोपीतांनी अत्यंत थंड डोक्याने नमुद बालकास जीवे ठार मारले. याकरीता आरोपी क्र. १ व २ हे जास्तीत जास्त कठोर शिक्षेस पात्र आहेत. '' त्याचप्रमाणे सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल सादर करून दिनांक २३/०५/२०१८ रोजी मा. सत्र न्यायालयाने आरोपीतांना खालीलप्रामाणे शिक्षा दिलेली आहे.

**आ.क्र.१) इम्तीयाज अहमद मोहम्मद सादीक अली शेख वय २२ वर्षे यास ...**

**अ)** भादवि. कलम ३०२ प्रमाणे **मरेपर्यंत फाशी,**

**ब)** भादवि. कलम ३६४—अ प्रमाणे **मरेपर्यंत सश्रम आजन्म कारावास** व रु.२५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास,

**२) आ.क्र.२) आझाद मोहम्मुदुल्ला अन्सारी वय २२ वर्षे यास ...**

**अ)** भादवि. कलम ३०२ प्रमाणे **मरेपर्यंत सश्रम आजन्म कारावास** व रु.२५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास,

**ब)** भादवि. कलम ३६४—अ प्रमाणे **मरेपर्यंत सश्रम आजन्म कारावास** व रु.२५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास,

**सदर पथकाने मा. न्यायालयासमक्ष सादर केलेल्या सबळ पुराव्यामुळे नमुद गुन्हयातील आरोपी क्र. १ यास ''मृत्युदंड'' ही अत्यंत कठोर शिक्षा झालेली आहे.**

फिर्यादी यांच्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलास रू.२५,००,०००/—इतक्या रकमेच्या खंडणीकरीता फिर्यादींच्या कायदेशिर रखवालीतुन अपहरण करून त्याचा अत्यंत निर्घुण पणे खुन करून त्याचा मृतदेह एका गोणीत घालून तो नाल्यामध्ये टाकणाऱ्या आरोपीतांना शाहू नगर पोलीस ठाणेच्या पथकाने अटक करून त्यांचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस अत्यंत कठोर अशी शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे मे – २०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

<u>शाहू पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार</u>

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक गजानन रामा देसुरकर (सेवानिवृत्त) |
| २ | सहा.पोलीस निरीक्षक संपतराव साहेबराव राऊत |
| ३ | पो.उप.निरी. ईश्वर जगनाथ चोरगे |
| ४ | पो.ह.क्र.२६४५१/रमेश सदाशिव कांबळे |

——— ००० ———